दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | सोमवार , 7 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 118 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# व्हे पावडर पुरवठादारांवर कारवाईनंतर आता भेसळखोरांपर्यंत तपास पोहोचणार का?

## पावडर नेमकी कोणाला विकली जात होती, याचा तपास होणे गरजेचे

■ आष्टी प्रतिनिधी :

आष्टी शहरात काही दिवसांपूर्वी दुधात भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हे पावडरचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात पावडरची वाहतूक करण्यासाठी वापरलेले पिकअप वाहन ताब्यात घेण्यात आले असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे दूध भेसळीच्या गोरखधंद्याला काही प्रमाणात धक्का बसला असला तरी, या प्रकरणाचा तपास आता केवळ पावडरचा साठा करणारे आणि वाहतूक करणाऱ्यांपुरता मर्यादित न राहता ही पावडर नेमकी कोणाला विकली जात होती, यापर्यंत पोहोचणार का, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आष्टी शहरात साठा करून ठेवण्यात आलेली व्हे पावडर कोणाला विकली जात होती आणि ती पावडर दुधात भेसळ करण्यासाठी नेमके कोण वापरत होते, याचा शोध तपास यंत्रणांनी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण दुधात भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी पावडर पुरवठा करणारा किंवा तिचा साठा करून विक्री करणारा जितका दोषी आहे, तितकाच प्रत्यक्ष ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करत दुधात भेसळ करणारा व्यक्तीदेखील दोषी आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन पावडर खरेदी करणारे आणि तिचा वापर करून दुधात भेसळ करणारे कोण आहेत, याचा तपास होणे अपेक्षित आहे. आष्टी तालुक्यात दुधात भेसळ करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याची चर्चा सातत्याने होत आहे. दूध हा दररोजच्या आहारातील अत्यंत महत्त्वाचा पदार्थ असल्याने त्यामध्ये जाणीवपूर्वक भेसळ करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्रभर भेसळखोरानंविरोधात विरोधात मोहीम उभारली असताना देखील आष्टी शहरात दुधात भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरचा साठा करून त्याची विक्री केली जात होती, ही बाब समोर आल्याने भेसळखोरांचे नेटवर्क किती निर्ढावलेले आहे, याची कल्पना येते. पावडरचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई झाली असली तरी, संबंधित पावडर खरेदी करून प्रत्यक्ष दुधात भेसळ करणाऱ्यांना इतर मार्गाने किंवा इतर ठिकाणांहून अशाच प्रकारच्या पावडरचा पुरवठा होत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे केवळ एक साठा जप्त करून किंवा काही आरोपींना अटक करून हे प्रकरण न थांबवता दुधातील भेसळीच्या संपूर्ण साखळीचा शोध घेण्याची गरज आहे. जप्त करण्यात आलेल्या व्हे पावडरची विक्री कोणाला करण्यात आली, यासाठी कोणकोणते व्यवहार झाले, हि पावडर कोणत्या दूध विक्रेते, दूध संकलन केंद्रे किंवा संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचली, याचा सखोल तपास झाल्यास दूध भेसळीच्या गोरखधंद्याचे धागेदोरे हाती लागू शकतात. दूध भेसळ ही केवळ आर्थिक फसवणूक नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे. त्यामुळे व्हे पावडरचा पुरवठा करणाऱ्यांबरोबरच तिचा वापर करून दुधात भेसळ करणाऱ्यांचाही शोध घेऊन त्यांच्यावर कायद्यानुसार कडक कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे आष्टी तालुक्यातील दूध भेसळीच्या रॅकेटचा पर्दाफाश होतो का आणि तपास यंत्रणा या साखळीतील प्रत्यक्ष भेसळखोरांपर्यंत पोहोचतात का, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.






■ गेल्या काही दिवसापूर्वी आष्टी मध्ये दुधात भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी पावडर पकडण्यात आली होती याबाबत आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, जो पावडर साठवणारा होता त्याने बऱ्याच दिवसानंतर ही पावडर खरेदी केली होती. ती पावडर विक्री होण्याच्या आधीच पकडली गेली आहे. त्याचबरोबर यातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याने पावडर कोणा कोणाला पुरवठा केले जात होती याबाबत माहिती मिळत नाही. ज्यावेळेस मुख्य आरोपी पकडला जाईल त्यावेळेसच कोणाकोणाला पुरवठा होत होता हे समोर येईल .



# ना . पंकजाताई मुंडे केरळ दौऱ्यावर ; तिरुवनंतपुरम येथे भाजपच्या नगरसेवकांशी साधला संवाद

## प्रभू पद्मनाभस्वामींचेही घेतले दर्शन ; पदाधिकाऱ्यांनी केले उत्स्फूर्त स्वागत

■ मुंबई प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे केरळ दौऱ्यावर असून आज त्यांनी तिरुवनंतपुरम येथे भाजपचे महापौर व नगरसेवकांशी संवाद साधला. पक्ष कार्यालयात त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. केरळच्या राजकीय इतिहासात प्रथमच भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वात तिरुवनंतपुरम येथे महानगरपालिकेत सत्ता स्थापन झाली असून भाजपचा उमेदवार महापौर पदावर विराजमान झाला आहे. हा विजय पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाचे आणि जनतेच्या विश्वासाचे फलित आहे अशा शब्दांत त्यांनी सर्व नवनियुक्त नगरसेवकांचे अभिनंदन केले. ना. पंकजाताई समवेत यावेळी राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, आ. श्वेता महाले तसेच महापौर श्री. राजेश यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



### पद्मनाभस्वामी मंदिरात घेतले दर्शन

■ ना. पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई, भगिनी ॲड यश:श्रीताई मुंडे यांच्यासह तिरुवनंतपुरम येथील प्रसिद्ध व पवित्र अशा श्री पद्मनाभस्वामी मंदिरात जाऊन भगवान श्री पद्मनाभस्वामींचे दर्शन घेतले. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, आ. श्वेता महाले यावेळी उपस्थित होत्या. अनंत शयन मुद्रेत विराजमान प्रभूंच्या अलौकिक आणि भव्य रूपाचे दर्शन घेऊन मन अत्यंत प्रसन्न झाले. या मंदिरातील आध्यात्मिक ऊर्जा आणि पवित्र वातावरणाचा अनुभव खरोखरच शब्दांच्या पलीकडचा आहे अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.तत्पूर्वी सकाळी विमानतळावर केरळ भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अतिशय आपुलकीने त्यांचे स्वागत केले. या प्रसंगी जे.आर. पद्मकुमार जी, व्ही.टी. रामा जी, लीना मोहन जी यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# मुंबईत दिव्यांगांच्या मोफत बेस्ट बस प्रवासावर ७.६४ कोटींचा खर्च

## मागील आर्थिक वर्षातील अनुदानाची रक्कम बेस्टला महापालिका अदा करणार

■ मुबई ( विशेष प्रतिनिधी)

मुंबईतील दृष्टीहीन आणि ४० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना बेस्ट बसची सेवा मोफत उपलब्ध करून दिली जाते. या मोफत प्रवास सवलती अंतर्गत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन( बेस्ट ) उपक्रमाला महापालिकेच्या वतीने ७.६४ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील आहे.




सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जेंडर बजेट अंतर्गत्त उपलब्ध रु. ६.०० तरतूदीतून दृष्टीहीन व ४० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना उपक्रमाने मोफत प्रवास सवलती अंतर्गत एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीतील एकूण ४ कोटी ३८लाख ०४ हजार ९८३ एवढ्या देयकाची रक्कम अनुदान म्हणून सप्टेंबर २०२५ मध्ये बेस्ट उपक्रमाला अदा करण्यात आली. तर आता बेस्ट उपक्रमाने दिव्यांग व्यक्तींना मोफत प्रवास सवलती अंतर्गत एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीसाठी एकूण ७ कोटी ६४ लाख ५५ हजार १७० एवढ्या रक्कमेचे अधिदान करण्याची मागणी केली आहे.

दिव्यांग व्यक्तींना परिवहन उपक्रमाने (बेस्ट) मोफत प्रवास सवलत देण्याकरीता ५.०० कोटी एवढ्या निधीची तरतूद उपलब्ध आहे. आता उर्वरित २ कोटी ६४ लाख ५५ हजार १७० रुपये एवढा निधी संचालक (नियोजन) विभागाच्या उपलब्ध करण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील एकूण रु. ७. ६४ कोटी रुपयांची प्रतिपुर्ती स्वरुपात अनुदान सॅप प्रणालीतून विहित पध्दतीप्रमाणे बेस्ट उपक्रमास अदा करण्यात येईल.

केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी समान संधी, संरक्षण व संपुर्ण सहभाग अधिनियम १९९५ मधील कलम ४० अनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दिव्यांगांसाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांगांसाठी राखीव ठेवलेला ३ टक्के निधी खर्च करण्याच्या मार्गदर्शक सूचनेतील शिफारशी नुसार नागरी वाहतूक व्यवस्थेमध्ये दिव्यांगांकरीता सवलत देणे व त्याकरीता होणा-या खर्चाची भरपाई करण्यासाठी तरतूद करण्यात येते. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या संचालक (नियोजन) विभागाच्या वतीने यासाठी निधीची तरतूद करून दिव्यांगाना मोफत बस प्रवासाची सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

# उत्तर मुंबईत सहा ठिकाणी कौशल्य विकास केंद्रांची उभारणी

## स्थानिक पातळीवर कार्यरत ऑटोरिक्षा, टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे प्रशिक्षण वर्ग

■ मुंबई (प्रतिनिधी)

उद्योग जगतातील मनुष्यबळाची मागणी पाहता उत्तर मुंबईत सहा ठिकाणी कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून तरूणाईला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून कौशल्य विकास केंद्रासाठी पश्चिम उपनगरात विविध ठिकाणी जागांचा शोध घेण्यात येत आहे. उद्योग जगातील बदलत्या तंत्रज्ञानाला कुशल मनुष्यबळाची सांगड घालण्यासाठी या कौशल्य विकास केंद्राची उभारणी करण्यात येईल, असे स्पष्ट करत केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी स्थानिक पातळीवर कार्यरत ऑटोरिक्षा, टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे प्रशिक्षण वर्गही याठिकाणी चालविण्यात यावेत, अशीही सूचना त्यांनी केली.

कांदिवली येथील ठाकुर व्हिलेज याठिकाणी कौशल्य विकास केंद्रासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) यांच्यात सामंजस्य करार शनिवारी ५ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. मुंबई महानगरपालिकेने या कौशल्य विकास केंद्रासाठी समाज कल्याण सुविधा भूखंड उपलब्ध करून दिला आहे. कौशल्य विकास केंद्रासाठीच्या सामंजस्य करारप्रसंगी मुंबईचे उपमहापौर संजय घाडी, नगरसेविका निशा परुळेकर, नगरसेवक दीपक(बाळा) तावडे, अतिरिक्त आयुक्त (शहर) प्राजक्ता लवंगारे, एनएसडीसीचे प्रमुख कार्यक्रम अधिकारी संजीव सिंह तसेच महिंद्रा समुह आणि लार्सन ॲण्ड टुब्रो समुहाचे अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना पियुष गोयल यांनी उद्योग जगताला मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाची गरज आहे. अशावेळी विविध ठिकाणी कार्यरत मनुष्यबळाने अद्ययावत प्रशिक्षणाच्या माध्यमातून नवनवीन रोजगाराच्या संधी मिळवायला हव्यात. त्यासाठी सायंकाळच्या वेळी तसेच आठवड्याच्या शेवटी कौशल्य विकास केंद्राच्या ठिकाणी प्रशिक्षणाचे वर्ग उपलब्ध करून देण्यात येतील. तरुणाईला विविध भाषा आत्मसात व्हाव्यात यासाठी कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, असेही ते म्हणाले.

# १५ दिवसात वाशी, विभाग व अतिक्रमण अधिकारी यांची बदली न झाल्यास पुन्हा उपोषण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशीतील मार्जिनल स्पेस वरील अतिक्रमण हटवण्यात यावे आणि कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची बदली करण्यात यावी या प्रमुख मागणीला घेऊन ३१ ऑगस्ट रोजी सुरु केलेलं अमरण उपोषण अखेर २ तारखेला दुपारी दोन वाजता पुढील पंधरा दिवसासाठी स्थागित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगर पालिकेचे सहा. आयुक्त रमेश राठोड, उपायुक्त संजय शिंदे यांचे स्वीय सहायक दुर्गेश आखाडे आणि वरिष्ठ लिपिक जितेंद्र सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे यांचे लेखी निवेदन देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली.पत्रात वाशी विभागातील मार्जिनल स्पेस मोकळे करून घेण्या संदर्भात या पुढेही सातत्याने दांडात्मक करवाई सुरु



ठेवणार असल्याचे आश्वसन देण्यात आले असून सहा. आयुक्त सुखदेव येडवे आणि अतिक्रमण अधिकारी जांभळे यांची प्रशासनाने बदली प्रक्रिया सुरु केल्याचे रमेश राठोड यांनी तोंडी सांगितले आहे.

पुढील १५ दिवसत या दोन्ही अधिकाऱ्यांची इतर विभागात बदली करावी अन्यथा मी १५ दिवसांनी याच ठिकाणी परत उग्र अमरण उपोषण करेन असा लिखित इशारा प्रदीप वाघमारे यांनी भेटीसाठी अधिकाऱ्यांना दिला आहे. या अमरण उपोषण आंदोलनाला नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस ( श. प.) वंचित बहुजन आघाडी, रिब्लिकन सेना,राष्ट्रीय स्वाभिमानी संघटना तसेच विविध महिला संघटना यांनी आपले समर्थन जाहीर केले आहे. या तीन दिवशीय आमरण उपोषणाला नवी मुंबईतील विविध राजकीय पक्ष आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रदीप वाघमारे यांची भेट घेऊन आम्ही आपल्या सोबत असल्याचे सांगितले आहे. कामगार नेते प्रदीप वाघमारे यांचे अमरण उपोषण यशस्वि करण्यासाठी शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिपक सिंग, मा. नगरसेवक मनोहर जोशी, सचिन पाटील, बाळकृष्ण खोपडे, विनोद वानखेडे, विजय गायकवाड, प्रवीण गवई, प्रेमनाथ भगत,रमेश मोरे, सुनील इंगळे, महेंद्र भिवसेने,हनुमंत माने नितीन गायकवाड , सुनील गुप्ता, प्रकाश सुरवाडे,भावेश कांबळे, राजू पारवे,अनिल रनबावळे, राजू घोडे, मुल्लाजी यांनी परिश्रम घेतले.

# अमृताहुनी गोड'मधून ज्येष्ठ संगीत मान्यवरांचा सन्मान आणि स्वरसोहळा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या अथवा ७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या संगीत क्षेत्रातील मान्यवर कलाकारांचा सन्मान तसेच त्यांनी गायलेल्या, स्वरबद्ध केलेल्या आणि संगीत संयोजन केलेल्या गीतांचा व नृत्याचा विशेष स्वरसोहळा 'अमृताहुनी गोड' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे हा विशेष कार्यक्रम होणार आहे. संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ कलाकारांचा सन्मान करणे, त्यांच्या कलाकृतींचे स्मरण करणे आणि त्यांच्या सांगीतिक योगदानाचा नव्या पिढीशी परिचय करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.या कार्यक्रमात श्रीधर फडके, उत्तरा केळकर, रवींद्र साठे, भीमराव पांचाळे, अजित कडकडे, डॉ. मंजिरी देव आणि अप्पा वढावकर यांचा सन्मानार्थी व विशेष सहभागी म्हणून सहभाग असणार आहे. त्यांच्या कलाप्रवासाला उजाळा देत त्यांच्या गायन, स्वररचना आणि संगीताशी संबंधित निवडक कलाकृतींचे सादरीकरण या स्वरसोहळ्यात करण्यात येणार आहे.कार्यक्रमात मंदार आपटे, सोनाली कर्णिक, धनश्री देशपांडे, शार्दुल कवठेकर, प्राजक्ता सातर्डेकर आणि ओंकार प्रभूघाटे हे गायक कलाकार सादरीकरण करणार आहेत. विघ्नेश जोशी निवेदन करणार असून, सागर साठे संगीत संयोजनाची जबाबदारी सांभाळणार आहेत. तसेच डॉ. मंजिरी देव यांच्या शिष्यांचे नृत्य सादरीकरण हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण असणार आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ व ज्येष्ठतम कलावंतांच्या योगदानाचा गौरव करणे, त्यांच्या कलासाधनेचा वारसा जतन करणे आणि तो रसिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य आहे. शिल्लक प्रवेशिका रविवार, ६ सप्टेंबर २०२६ पासून नाट्यगृहावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कार्यक्रमातील काही रांगा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्येष्ठ संगीत मान्यवरांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या सांगीतिक योगदानाला समर्पित 'अमृताहुनी गोड' या विशेष स्वरसोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

# प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांचे स्पष्टीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून माझ्याविरोधात वैयक्तिक आरोप करण्यात येत असून, माझ्या राजीनाम्याची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट करणे आवश्यक असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी म्हटले आहे.

औषध निरीक्षक परीक्षेशी संबंधित प्रश्नपत्रिका फुटीची घटना जानेवारी २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले. मात्र, भीमनवार यांनी स्पष्ट केले की, त्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली, तर ३ मार्च २०२६ रोजी प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारला. त्यामुळे या घटनेच्या कालावधीबाबत वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. औषध निरीक्षक परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गंभीर दखल घेतली असून, यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक तसेच सुरक्षा उपाययोजना सुचविण्यासाठी आयोगाने अंतर्गत उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. तसेच, संपूर्ण परीक्षा प्रक्रियेत आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी शासनानेही स्वतंत्र उच्चस्तरीय समिती स्थापन केली असल्याचे भीमनवार यांनी सांगितले.अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आपले संपूर्ण लक्ष आयोगाच्या परीक्षा व भरती प्रक्रियेची विश्वासार्हता, पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता अधिक बळकट करण्यावर केंद्रित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आयोगावर सोपविण्यात आलेल्या वाढीव भरतीच्या जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा व भरती प्रक्रिया अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा हाती घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. "आयोगाची उच्च परंपरा, निष्पक्षता आणि विश्वासार्हता जपणे तसेच लाखो उमेदवारांना न्याय्य आणि समान संधी उपलब्ध करून देणे ही माझी घटनात्मक जबाबदारी आहे.

ही जबाबदारी पूर्ण पारदर्शकता, निष्पक्षता आणि सचोटीने पार पाडण्यासाठी मी कटिबद्ध आहे," असे भीमनवार यांनी म्हटले आहे. सार्वजनिक परीक्षांबाबत लोकप्रतिनिधी, उमेदवार आणि नागरिकांना प्रश्न उपस्थित करण्याचा तसेच चिंता व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. "लोकशाही व्यवस्थेत अशा प्रश्नांचे मी स्वागतच करतो. मात्र, कोणत्याही गंभीर आरोपाचे मूल्यांकन वस्तुस्थिती, अधिकृत नोंदी आणि पुराव्यांच्या आधारेच झाले पाहिजे," असे त्यांनी स्पष्ट केले. सार्वजनिक भरती प्रक्रियेत लाखो तरुण उमेदवारांचे भवितव्य गुंतलेले असते. त्यामुळे अशा संवेदनशील विषयांचे वैयक्तिक आरोप किंवा राजकीय वादामध्ये रूपांतर होऊ नये, अशी नम्र विनंतीही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी बीडच्या विकासाला नवी गती

**मुंबई : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी 'बीड–पुणे' रेल्वे येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर धावणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच डिसेंबरअखेर बीड–मुंबई (पनवेल) रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व कामे युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे 'अहिल्यानगर–बीड–परळी' रेल्वे मार्गाच्या प्रगतीचा आढावा तसेच 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता (निर्माण) बी. के. सिंह, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, वरिष्ठ विभागीय अभियंता व्ही. पी. पैठणकर, सीसीएम डॉ. सुमंत देऊळकर, विल्यम केरी यांच्यासह रेल्वे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी गती देणाऱ्या 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवेसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे 'अहिल्यानगर–बीड–परळी' या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला गती मिळाली. गतवर्षी बीडकरांची ४० वर्षांची प्रतीक्षा संपवून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी (१७ सप्टेंबर २०२५ रोजी) 'बीड ते अहिल्यानगर' रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू झाली आणि आता यावर्षी त्याच ऐतिहासिक दिनी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू होत आहे.'बीड–पुणे' रेल्वे सुरू झाल्यानंतर जिल्ह्याची पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राशी थेट व अधिक सक्षम रेल्वे जोडणी निर्माण होणार आहे. यामुळे बीडच्या कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि व्यापार क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून नागरिकांच्या प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होण्यासही मदत होणार आहे. बीडच्या आर्थिक विकासासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सूचना देताना सांगितले की, १७ सप्टेंबर रोजी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी उर्वरित सर्व तांत्रिक, प्रशासकीय व सुरक्षाविषयक प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात. त्याचबरोबर डिसेंबरअखेर 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यक कामांचा कालबद्ध आराखडा तयार करून सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत.

येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या 'बीड–पुणे' रेल्वे सेवेच्या ऐतिहासिक शुभारंभ कार्यक्रमाची सर्व तयारी अत्यंत नियोजनबद्ध, प्रभावी आणि समन्वयाने करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. 'बीड–पुणे' आणि पुढे 'बीड–मुंबई' ही केवळ रेल्वे सेवा नसून बीडच्या विकासाला जोडणारी नवी जीवनवाहिनी आहे. दिवंगत अजितदादांनी पाहिलेल्या विकसित बीडच्या स्वप्नपूर्तीसाठी या रेल्वे जोडणीची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र–न्यू साउथ वेल्स भागीदारीला अधिक व्यापक, परिणामाभिमुख स्वरूप देण्यात येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स यांच्यात २०१२ पासून असलेली भागीदारी अधिक व्यापक, महत्वकांक्षी आणि परिणामाभिमुख करण्यात येईल, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि न्यू साउथ वेल्सचे प्रमुख क्रिस मिन्स यांच्या उपस्थितीत वर्षा या शासकीय निवासस्थानी वित्तीय सेवा, स्वच्छ ऊर्जा, प्रगत उत्पादन, महत्त्वपूर्ण खनिजे, कृषी तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञान, संस्कृती आणि क्रीडा या क्षेत्रामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. ही क्षेत्रे २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राज्य बनविण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई आणि सिडनी ही अनुक्रमे भारत आणि ऑस्ट्रेलियाची वित्तीय व व्यावसायिक प्रवेशद्वारे आहेत. त्यामुळे न्यू साउथ वेल्समधील वित्तीय संस्था, व्यावसायिक सेवा कंपन्या, पायाभूत सुविधा गुंतवणूकदार आणि सुपरअॅन्युएशन फंडांनी महाराष्ट्राला भारतातील गुंतवणुकीचे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून पाहावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. महाराष्ट्रातील वाहतूक पायाभूत सुविधा, औद्योगिक कॉरिडॉर, नागरी विकास, अक्षय ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.तंत्रज्ञान, उत्पादन आणि ऊर्जा संक्रमण या क्षेत्रातही मोठ्या सहकार्याची क्षमता आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात सक्षम परिसंस्था उभारत आहे. न्यू साउथ वेल्सकडील खाण तंत्रज्ञान, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा आणि नवोन्मेषातील अनुभवाच्या माध्यमातून बॅटरी उत्पादन, हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक क्षेत्रात संयुक्त प्रकल्प विकसित करता येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.कौशल्य विकासाच्या क्षेत्रात न्यू साउथ वेल्सच्या टेक्निकल अॅण्ड फर्दर एज्युकेशन आणि महाराष्ट्रातील औद्योगिक संस्था व कौशल्य विकास संस्थांमध्ये संयुक्त अभ्यासक्रम, प्रशिक्षक प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण आणि उद्योगाशी संलग्न प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्याची संधी आहे. तसेच न्यू साउथ वेल्समधील विद्यापीठांनी नवी मुंबईजवळील आंतरराष्ट्रीय शिक्षण नगरीत सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.न्यू साउथ वेल्सचे दुष्काळ व्यवस्थापन, शेती आणि जलसंधारणाचा अनुभव मराठवाडा व विदर्भासाठी उपयुक्त ठरू शकतो. यासाठी कृषी विद्यापीठांमध्ये भागीदारी वाढविण्याची अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सामंजस्य कराराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ९० दिवसांत संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार असून, हा गट प्रमुख प्रकल्प निश्चित करून दोन्ही राज्यांतील संस्थांच्या जबाबदाऱ्या ठरवेल व प्रगतीचा नियमित आढावा घेईल.महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स राज्यांमधील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी खाणकाम, तंत्रज्ञान, पर्यटन आणि शिक्षण या क्षेत्रांसह प्रगत उत्पादन, सर्क्युलर इकॉनॉमी, आरोग्यसेवा आणि खाण तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात येईल. महाराष्ट्र आणि न्यू साऊथ वेल्स यांच्यातील सामंजस्य करारामुळे दोन्ही राज्यांमधील आर्थिक संबंधांना नवी दिशा मिळाली आहे, असे न्यू साऊथ वेल्सचे प्रमुख क्रिस मिन्स यांनी सांगितले.महाराष्ट्रातील तरुण अनेक दशकांपासून शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियात जात असून, न्यू साऊथ वेल्समधील भारतीय-ऑस्ट्रेलियन समुदायाचे महाराष्ट्राशी कौटुंबिक, सांस्कृतिक आणि भाषिक संबंध आहेत. हा समुदाय दोन्ही राज्यांमधील संबंधांचा महत्त्वाचा दुवा असल्याचे मिन्स यांनी सांगितले. भारतीय वंशाच्या ऑस्ट्रेलियन नागरिकांनी ऑस्ट्रेलियाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांच्या भारतीय वारशाचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.महाराष्ट्र आणि न्यू साऊथ वेल्सच्या अर्थव्यवस्थांमध्ये परस्परपूरक क्षमता असून, त्याचा उपयोग द्विपक्षीय सहकार्य वाढविण्यासाठी करता येईल. सामंजस्य करारांतर्गत निश्चित क्षेत्रांमध्ये ठोस संधी शोधण्यासाठी संयुक्त कार्यगट स्थापन करण्याच्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रस्तावाचे प्रीमियर मिन्स यांनी स्वागत केले. महाराष्ट्र आणि न्यू साऊथ वेल्समधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतलेल्या पुढाकाराचे आणि दूरदृष्टीचे कौतुक करून, त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सिडनी भेटीचे निमंत्रण दिले.यावेळी राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा, उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन, राजशिष्टाचार विभागाचे प्रधान सचिव डॉ. राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांच्यासह न्यू साउथ वेल्सचे ट्रेझरर डॅनियल मुखी, ऑस्ट्रेलियाचे भारतातील उच्चायुक्त फिलिप ग्रीन, सचिव मायकल कॉट्स-ट्रॉटर, व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त मालिनी दत्त, संचालक सचिन सक्सेना उपस्थित होते.

## संपादकीय

# नवा अध्याय

परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता, सुरक्षितता आणि निष्पक्षता या तीनही बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली समिती ही परीक्षा सुधारणांच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

गेल्या ३७ दिवसांपासून कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनामुळे दिल्लीतील वातावरण ढवळून निघाले होते. या आंदोलनाचे केंद्रबिंदू होते नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराचे प्रकरण. अभिजित दीपके हा तरुण परदेशातून येऊन आंदोलनात सहभागी झाला आणि त्याच्या आवाहनाला प्रतिसाद मिळाला, हे चित्र निश्चितच लक्षवेधी होते. त्याने उपस्थित केलेला मुद्दा मात्र अत्यंत महत्त्वाचा होता. कारण नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम झाला होता. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित असलेल्या या विषयाचे गांभीर्य सरकारलाही जाणवले. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तातडीने नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करून नीट परीक्षेतील त्रुटी दूर करण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेतला. हे एक स्वागतार्ह पाऊल आहे. सर्वोच्च न्यायालयानेही परीक्षा पद्धती अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली. त्यामुळे निलेकणी समितीकडून केवळ सरकारलाच नव्हे, तर न्यायव्यवस्थेलाही मोठ्या अपेक्षा आहेत. नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकार हा या संपूर्ण प्रकरणातील मुख्य मुद्दा होता. मात्र, काही राजकीय पक्षांनी या विषयाला सरकारविरोधी आंदोलनाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न केला, हे दुर्दैवी म्हणावे लागेल. आता आंदोलनाची तीव्रता कमी झाली असून सरकारने परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. निलेकणी यांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि आगामी कायदेशीर उपाययोजनांमुळे परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होईल, अशी अपेक्षा आहे. पण त्यातून गैरफायदा घेणारे गैरप्रकार करणारे आणि त्यावर आंदोलन करून आपली पोळी भाजणारे काँग्रेस आणि आपसारखे पक्ष एकाच फटक्यात मोदी यांनी गारद केले आहेत.

मोदी यांच्या नव्या समितीत इस्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ, अमृतलाल मीना, अनिता करवाल यांच्यासारखे नामवंत सदस्य आहेत. या प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केले आहे. नीट परीक्षेतील गैरव्यवहारांना आळा घालून भविष्यात परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पद्धतीने पार पडेल, यासाठी ही समिती प्रभावीपणे काम करेल, अशी अपेक्षा आहे. या समितीचे प्रमुख नंदन निलेकणी यांचे कर्तृत्व वादातीत आहे. देशात आधार प्रणालीच्या माध्यमातून त्यांनी डिजिटल पारदर्शकतेला मोठी चालना दिली. आज कोट्यवधी नागरिकांना विविध सरकारी योजनांचा लाभ थेट आणि सुरक्षित पद्धतीने मिळत आहे. या व्यवस्थेमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढली असून अनेक योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली आहे. पूर्वी अनेक कल्याणकारी योजनांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्यामुळे काही अपात्र लोक लाभ घेत असत आणि खरे लाभार्थी वंचित राहत असत. मात्र आधारसारख्या डिजिटल प्रणालीमुळे ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली. अशाच प्रकारची पारदर्शकता आणि विश्वासार्हता परीक्षा व्यवस्थेत आणण्याचे आव्हान आता नंदन निलेकणी यांच्या समितीसमोर आहे. नीट परीक्षेतील सुधारणा सुचवण्यासाठी निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणे हे निश्चितच स्वागतार्ह पाऊल आहे. या माध्यमातून भविष्यात कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ नये आणि प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, ही अपेक्षा आहे. या समितीवर टीका करताना काँग्रेसने म्हटले आहे की, ही समिती मोदी सरकारची प्रतिमा सुधारण्यासाठी स्थापन करण्यात आली. मात्र अशा राजकीय आरोपांपेक्षा देशासाठी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित करणे हा आहे. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून निष्पक्ष आणि विश्वासार्ह प्रणाली निर्माण करणे ही काळाची गरज आहे. नीट परीक्षेतील सुधारणांसाठी समितीला अनेक महत्त्वाची कामे सोपवण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली ही समिती केवळ नीट परीक्षेपुरती मर्यादित न राहता देशातील संपूर्ण परीक्षा व्यवस्थेला अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि निष्पक्ष बनवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी आशा आहे.

नीट परीक्षेतील पेपरफुटीप्रकरणी मोदी सरकार किती गंभीर आहे, हे या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या कृतीगटाच्या स्थापनेवरून स्पष्ट होते. तसेच संसदेत सादर होणाऱ्या विधेयकानुसार, पेपरफुटी किंवा परीक्षेतील गैरप्रकार करताना आढळणाऱ्यांना पाच ते दहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि ५० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद केली जाणार आहे. त्यामुळे विरोधकांनी केलेल्या आरोपांची धार कमी झाल्याने आता त्यांनी विद्यार्थ्यांवरील कथित कारवाईचे व्हिडीओ दाखवण्यास सुरुवात केली. मात्र, आंदोलकांकडून पोलिसांवर झालेल्या कथित हल्ल्यांचे आणि दिलेल्या आक्षेपार्ह घोषणांचे व्हिडीओही उपलब्ध असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आवश्यक असते. परीक्षेतील गैरप्रकारांचा सर्वाधिक परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. नीट परीक्षेतील गोंधळानंतर फेरपरीक्षा घेण्यात आली आणि अनेक विद्यार्थ्यांना यश मिळाले. मात्र, सध्याच्या आंदोलनामागे विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा राजकीय हेतू अधिक असल्याचा आरोप होत आहे. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी परीक्षा पद्धतीत मूलभूत सुधारणा गरजेच्या आहेत. नीटसारख्या परीक्षा टप्प्याटप्प्याने घेणे, ऑनलाइन पद्धतीचा विचार करणे आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेला अधिक सक्षम बनवणे आवश्यक आहे. पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह परीक्षा प्रणाली ही काळाची गरज आहे. सरकारने तज्ज्ञांच्या मदतीने सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या शिक्षणमंत्र्यांसमोर राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याचे मोठे आव्हान आहे.

# राजे उमाजी नाईक : स्वराज्याची ज्वाला

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या राजकीय नेत्यांच्या कार्याचा इतिहास नाही. या इतिहासाच्या पाठीशी असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्ती, समाजघटक, कष्टकरी आणि वंचित जनसमुदायांच्या त्यागाची, संघर्षाची आणि स्वाभिमानाची परंपरा उभी आहे. परकीय सत्तेविरुद्धचा असंतोष देशाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत होता. महाराष्ट्राच्या भूमीतही ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराला प्रारंभीच विरोध करणाऱ्या अनेक धाडसी व्यक्तींनी आपल्या परीने प्रतिकार उभारला. या आरंभीच्या ब्रिटिशविरोधी संघर्षातील एक महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजे उमाजी नाईक. ७ सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका शूर व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे, तर स्वाभिमान, स्वराज्य, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभे राहण्याच्या मूल्यांचे स्मरण करणे होय.**




राजे उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी (पुरंदर किल्ला) येथे झाला. त्यांचे वडील दादाजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीशी संबंधित होते. त्या काळात रामोशी समाजातील अनेक कुटुंबांवर किल्ल्यांची राखण, रात्रीची गस्त, पहारा आणि सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात. या पारंपरिक कामामुळे या समाजातील लोकांमध्ये धैर्य, शारीरिक कणखरपणा, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि परिसराची सूक्ष्म माहिती असण्याचे कौशल्य विकसित झाले होते. उमाजी नाईक यांचे बालपणही अशाच वातावरणात गेले. तलवार, भाला, कुऱ्हाड, धनुष्यबाण, गोफण आणि दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांच्या वापराचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साहसाबरोबरच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.

उमाजी नाईक यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी परिस्थिती ब्रिटिश सत्तेच्या विस्तारामुळे निर्माण झाली. ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील राजकीय आणि प्रशासकीय वर्चस्व वाढविल्यानंतर पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि स्थानिक व्यवस्था विस्कळीत होऊ लागल्या. अनेक समाजघटकांचे पारंपरिक अधिकार आणि उपजीविकेची साधने हिरावली जाऊ लागली. रामोशी समाजालाही या बदलाचा मोठा फटका बसला. पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीसारख्या पारंपरिक जबाबदाऱ्यांपासून त्यांना दूर करण्याचे प्रयत्न झाले. वतने, जमिनी आणि पारंपरिक अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे केवळ आर्थिक प्रश्न निर्माण झाला नाही, तर समाजाच्या स्वाभिमानालाही धक्का बसला. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार अचानक परकीय सत्तेच्या निर्णयामुळे संपुष्टात येत असल्याची भावना उमाजी नाईक यांच्या मनात तीव्र झाली.

या परिस्थितीत उमाजी नाईकांनी अन्याय स्वीकारण्याऐवजी प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशी समाजातील अनेक लोक एकत्र आले. मात्र त्यांचा संघर्ष केवळ एका समाजाच्या तक्रारींपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक जनतेवर होणारे आर्थिक शोषण, अन्याय आणि अधिकारशाली घटकांकडून होणारी पिळवणूक यांच्याविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. सावकार, जमीनदार आणि सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या घटकांविषयी त्यांचा रोष होता. त्यामुळे त्यांच्या संघर्षामध्ये राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक न्यायाची आकांक्षाही दिसून येते. तत्कालीन ग्रामीण समाजातील विषमता आणि असुरक्षितता लक्षात घेतल्यास उमाजी नाईकांच्या नेतृत्वामागे सामान्य लोकांच्या असंतोषाची मोठी पार्श्वभूमी होती.

उमाजी नाईकांचे सर्वांत प्रभावी सामर्थ्य म्हणजे त्यांचे संघटनकौशल्य. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना केवळ शस्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले नाही, तर परिस्थितीनुसार हालचाल करण्याची, गुप्त माहिती मिळविण्याची आणि ब्रिटिशांच्या सैन्यव्यवस्थेला चकवा देण्याची पद्धत विकसित केली. डोंगर-दऱ्या, जंगल, घाटवाटा आणि दुर्गम प्रदेश यांची त्यांना चांगली माहिती होती. या भौगोलिक ज्ञानाचा त्यांनी प्रभावी उपयोग केला. ब्रिटिश सैन्याची संख्या आणि साधने अधिक असतानाही स्थानिक परिस्थितीचा लाभ घेऊन उमाजी नाईकांच्या सहकाऱ्यांनी त्यांना अनेकदा अडचणीत आणले. अचानक हल्ला करून माघार घेणे, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घेणे या छापामार पद्धती त्यांच्या संघर्षाचे वैशिष्ट्य ठरल्या.

त्यांच्या या संघर्षात अनेक सहकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उमाजी नाईकांचे नेतृत्व वैयक्तिक शौर्यावर आधारित असले तरी त्यामागे संघटित लोकशक्ती होती. हीच त्यांच्या चळवळीची खरी ताकद होती. ब्रिटिशांच्या आधुनिक सैनिकी यंत्रणेसमोर स्थानिक लोकांच्या सहकार्याने उभा केलेला हा प्रतिकार त्या काळच्या परिस्थितीत अत्यंत धाडसी होता. त्यांच्या हालचालींमुळे ब्रिटिश प्रशासनाला मोठी चिंता निर्माण झाली. एका विशिष्ट प्रदेशापुरता मर्यादित न राहता हा असंतोष व्यापक होऊ शकतो, याची जाणीव ब्रिटिशांना झाली होती.

उमाजी नाईकांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वराज्याची त्यांची कल्पना. त्यांनी स्वतःला 'राजे' म्हणून संबोधले आणि ब्रिटिशांच्या प्रशासकीय सत्तेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी त्यांनी न्यायनिवाड्याची व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. १८२७ मध्ये त्यांच्या जाहीर आवाहनातून ब्रिटिशांच्या महसूलव्यवस्थेला सहकार्य न करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध उभे राहण्याचा संदेश देण्यात आला. ही भूमिका त्या काळातील परिस्थितीत अत्यंत धाडसी होती. ब्रिटिश सत्ता हळूहळू आपले प्रशासकीय जाळे मजबूत करत असताना तिच्या महसूलव्यवस्थेला विरोध करणे म्हणजे त्यांच्या शासनव्यवस्थेच्या मुळालाच आव्हान देणे होते.

१८३१ मधील उमाजी नाईकांचा जाहीरनामा त्यांच्या राजकीय विचारांच्या व्यापकतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानला जातो. या आवाहनातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक प्रतिकार उभारण्याची भूमिका स्पष्ट होते. ब्रिटिशांना महसूल देऊ नये, त्यांच्या सत्तेला सहकार्य करू नये आणि आपल्या भूमीच्या स्वाधिकारासाठी संघर्ष करावा, असा त्यामागील संदेश होता. विशेष म्हणजे या आवाहनाचा विस्तार एका समाजापुरता किंवा एका गावापुरता मर्यादित नव्हता. हिंदुस्थानातील विविध घटकांनी एकत्र येऊन परकीय सत्तेविरुद्ध उभे राहावे, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना त्या काळात आजच्या अर्थाने विकसित झालेली नसली तरी परकीय सत्तेविरुद्ध व्यापक जनप्रतिरोधाची कल्पना त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. म्हणूनच उमाजी नाईकांच्या कार्याचा अभ्यास केवळ स्थानिक बंड किंवा उठाव म्हणून न करता भारतीय स्वातंत्र्याच्या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.

उमाजी नाईकांच्या जीवनात संघर्षाबरोबरच चढ-उतारही आले. काही काळ त्यांनी ब्रिटिशांशी तडजोड केली आणि आत्मसमर्पण केले. त्यांना ब्रिटिश प्रशासनाकडून काही जबाबदारीही देण्यात आली. पुणे आणि सातारा परिसरातील शांतता राखण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. परंतु ब्रिटिश प्रशासन आणि उमाजी नाईक यांच्यातील मूलभूत अविश्वास दूर झाला नाही. त्यांच्या हालचालींविषयी पुन्हा संशय निर्माण झाला आणि ब्रिटिशांनी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले. यावरून त्यांच्या जीवनातील संघर्ष हा एका सरळ रेषेत चाललेला नव्हता, तर तत्कालीन राजकीय परिस्थिती, स्थानिक संबंध आणि ब्रिटिश धोरणे यांच्याशी सतत झुंज देत पुढे गेलेला होता.

ब्रिटिश प्रशासनाने उमाजी नाईकांना पकडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्यात आले. अखेरीस ८ ऑगस्ट १८३१ रोजी त्यांच्या पकडीसाठी दहा हजार रुपयांचे मोठे बक्षीस आणि चारशे बिघे जमीन देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेवरून उमाजी नाईक ब्रिटिश प्रशासनासाठी किती मोठे आव्हान ठरले होते, याची कल्पना येते. दीर्घकाळ त्यांचा शोध घेतल्यानंतर विश्वासघातामुळे त्यांना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. १५ डिसेंबर १८३१ रोजी उमाजी नाईक ब्रिटिशांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्यात उमाजी नाईकांना फाशी देण्यात आली. एका तरुण वयात सुरू झालेला त्यांचा संघर्ष अशा प्रकारे संपला; परंतु त्यांच्या बलिदानाने निर्माण केलेली प्रेरणा संपली नाही. उलट त्यांच्या मृत्यूनंतरही ब्रिटिशविरोधी प्रतिकाराच्या इतिहासात त्यांचे नाव कायम राहिले. १८५७ च्या व्यापक उठावापूर्वीच भारताच्या विविध भागांत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष आणि प्रतिकाराची विविध रूपे दिसत होती. महाराष्ट्रातील या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेत उमाजी नाईकांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ उच्चभ्रू किंवा राजकीय नेतृत्वापुरती मर्यादित नव्हती; ती सामान्य लोकांच्या मनातही खोलवर रुजलेली होती.

उमाजी नाईकांच्या इतिहासाचा विचार करताना वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या योगदानाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. इतिहासलेखनामध्ये अनेकदा राजे, सरदार, युद्धे आणि मोठ्या राजकीय घटनांना केंद्रस्थानी ठेवले जाते. मात्र त्या घटनांच्या पाठीमागे सामान्य जनतेचे योगदान, स्थानिक उठाव आणि सामाजिक संघर्ष दडलेले असतात. उमाजी नाईकांचा इतिहास या दुर्लक्षित बाजूकडे आपले लक्ष वेधतो. एका पारंपरिक व्यवसायावर आणि जीवनपद्धतीवर अवलंबून असलेल्या समाजघटकाने परकीय सत्तेच्या हस्तक्षेपाला दिलेला प्रतिकार हा सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केवळ शौर्यकथेच्या चौकटीत न करता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात केले पाहिजे.

आज आपण लोकशाही आणि संविधानाच्या आधारावर चालणाऱ्या भारतात जगत आहोत. त्यामुळे उमाजी नाईकांच्या संघर्षाचा अर्थ त्यांच्या काळातील सशस्त्र प्रतिकाराची पुनरावृत्ती असा घेणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या जीवनातून आजच्या समाजाने घ्यायचा संदेश वेगळा आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, आपल्या अधिकारांची जाणीव ठेवणे, शोषित आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि लोकशाही मार्गाने परिवर्तन घडवून आणणे ही त्यांच्या स्मृतीची आधुनिक व्याख्या ठरू शकते. आज अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संविधान, कायदा, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि लोकशाही संस्था आपल्याकडे आहेत. या साधनांचा जबाबदारीने आणि विवेकपूर्ण वापर करणे हीच आधुनिक काळातील संघर्षाची दिशा आहे.

उमाजी नाईकांच्या जयंतीचे महत्त्व म्हणूनच केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण करण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनातील स्वाभिमान, धैर्य, संघटनशक्ती आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांनी इतिहासाकडे केवळ गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्या सामाजिक परिस्थितीत एखादा संघर्ष निर्माण झाला, त्यामागे कोणते आर्थिक आणि राजकीय घटक होते, सामान्य लोकांची भूमिका काय होती आणि त्या संघर्षातून पुढील समाजाला काय शिकता येते, याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासातून इतिहास जिवंत होतो आणि वर्तमानाला दिशा देण्याची क्षमता त्याला प्राप्त होते.

आजही समाजात आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, संधीतील असमानता, शोषण आणि दुर्बल घटकांच्या अधिकारांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

घटकापर्यंत पोहोचविणे, प्रत्येकाला शिक्षणाची आणि प्रगतीची समान संधी देणे, श्रमाचा सन्मान करणे आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करणे ही आधुनिक लोकशाहीची जबाबदारी आहे. उमाजी नाईकांच्या स्मृतीचे खरे सार याच मूल्यांमध्ये आहे. त्यांच्या नावाने कार्यक्रम आयोजित करणे, प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे किंवा घोषवाक्ये देणे यापलीकडे जाऊन त्यांच्या संघर्षाचा सामाजिक आशय समजून घेणे गरजेचे आहे. इतिहासातील नायकांच्या स्मृती तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा त्या वर्तमानातील समाजनिर्मितीशी जोडल्या जातात.

राजे उमाजी नाईक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्वाभिमानाचे आणि प्रतिकाराचे तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांनी ज्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला, तो काळ अत्यंत प्रतिकूल होता. साधनांची कमतरता, संघटित ब्रिटिश सैन्य, राजकीय दबाव आणि सततचा पाठलाग या सर्व परिस्थितींमध्ये त्यांनी आपल्या ध्येयाचा पाठपुरावा केला. त्यांच्या जीवनाचा शेवट फाशीच्या दोरीवर झाला; मात्र त्यांचा विचार आणि संघर्षाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या जीवनाकडे पाहताना आपल्याला जाणवते की स्वातंत्र्य ही केवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्याची संकल्पना नसून ती माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी मूल्यव्यवस्था आहे.

७ सप्टेंबरला राजे उमाजी नाईक जयंती साजरी करताना म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच समाजातील अन्याय आणि विषमता कमी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्वाभिमानाची ज्योत ज्ञानाने अधिक प्रखर करणे, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणे, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. उमाजी नाईकांनी परकीय सत्तेविरुद्ध पेटविलेली प्रतिकाराची ज्वाला आज संविधानिक मूल्यांच्या प्रकाशात पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या स्मृतीतून धैर्य घ्यावे, त्यांच्या संघर्षातून स्वाभिमान शिकावा आणि त्यांच्या जीवनातून न्याय्य समाजनिर्मितीची प्रेरणा घ्यावी. इतिहासातील त्यांचे स्थान केवळ भूतकाळात नाही; अन्यायाविरुद्ध जागृत राहणाऱ्या प्रत्येक पिढीच्या वर्तमानात आणि भविष्यातही राजे उमाजी नाईकांची स्वराज्याची हाक निनादत राहील.



# मानवतातीर्थ रामेश्वर नगरीत श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात







**लातूर** | संपूर्ण जगात मानवतेचा आणि विश्वशांतीचा संदेश देणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कीर्तन, दहीहंडी आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्यास रामेश्वर नगरीतील तसेच परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा आनंद घेतला.

लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर नगरीचे सुपुत्र विश्वधर्मीय प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेबांच्या संकल्पनेतून जगासमोर सर्वधर्म समभाव आणि मानवताधर्माची जपणूक करणाऱ्या रामेश्वर या गावाची नवी ओळख निर्माण झाली आहे. रामेश्वर गावात दरवर्षी विविध उत्सव कार्यक्रम सर्व जाती-धर्मातील गावकरी एकत्रितपणे मोठ्या उत्साहात साजरे करतात.

विश्वशांती केंद्र आळंदी, माईस् एमआयटी पुणे आणि समस्त रामेश्वर ग्रामस्थ यांच्या वतीने यावर्षी पहिल्यांदाच विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर येथे भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा करण्यात आला. यानिमित्ताने २ दिवस अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यानुसार ४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री हभप अर्जुन महाराज लटपटे यांचे तर ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. विश्वधर्मी मानवता तीर्थभवन येथे हभप कृष्णा महाराज राऊत यांचे काल्याचे किर्तन झाले. यावेळी कीर्तनातून श्रीकृष्णाच्या जीवनचरित्रावर तसेच त्यांच्या विचार व शिकवणीवर प्रबोधन करण्यात आले. कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

श्रीकृष्ण जन्मोत्सव कीर्तनानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. 'गोविंदा आला रे आला' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. रामेश्वर येथील सरस्वती विद्यालयातील युवक व युवतीच्या गोविंदा पथकांनी उत्साहाने सहभाग घेतला. थरावर थर चढवत दहीहंडी फोडण्यात आली. भाविकांनी दहीहंडी सोहळ्याचा आनंद घेतला.

काल्याचे किर्तन आणि दहीहंडी कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमात भक्ती, उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक माजी सरपंच तुळशीरामअण्णा कराड, संत श्री गोपाळ बुवा महाराज शुगर अँड ॲग्रो फूड इंडस्ट्रीजचे चेअरमन राजेश कराड, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, प्रा. तेजस कराड, देवेंद्र कराड, रणवीर कराड, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, सुरज शिंदे, भागवत सोट, बन्सीभाऊ भिसे, चंद्रसेननाना लोंढे, प्रताप पाटील, शरद दरेकर, अनिल भिसे, अनंत चव्हाण, साहेबराव मुळे, विजय गंभीरे, दशरथ सरवदे, ॲड. मनोज कराड, शरद पाटील, सचिन कराड, डॉ. बाबासाहेब घुले, गोपाळ पाटील, विजय काळे, रुपेश थोरमोटे, सुरेश पाटील, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, रुपेश काळे, सोमनाथ वाघमारे, अशोक सावंत, आदिनाथ मुळे, अन्वर पटेल, बाबासाहेब भिसे, गोविंद देशमुख, किशोर घुट्टे, कमाल राजेखॉ पटेल, किरण मुंडे, शुभम खोसे, बालासाहेब कदम, दशरथ कराड, दत्ता सप्ताळ, संजय डोंगरे, राम भताने, अंकुश गणगे, बालाजी गवळी, राज जाधव, किशन शिरसागर, शशिकांत पाटील, देवराव मोहिते, बालासाहेब कदम, प्रकाश जाधव, सुरेश सूर्यवंशी, बापू देवकर यांच्यासह रामेश्वर गावातील आणि परिसरातील भाविक भक्त महिला पुरुष तरुण शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार, 7 सप्टेंबर 2026



# दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले चार दरोडेखोर जेरबंद

## सात जण पळून जाण्यात यशस्वी !







**केज / प्रतिनिधी -**

पोलीस ठाणे केज येथे पोलीस निरीक्षक राहुल सर्यतळ यांना मांजरसुंबा ते केज या रोडवर पिंपळगाव फाटा ते उमरी टोलनाका दरम्यान काही इसम धावत्या ट्रक वर चढुनट्रक मधील साहित्य काढणे तसेच जबरी चोरी करणे, दरोडा टाकणे या बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याने पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या आदेशाने पिंपळगाव फाटा ते उमरी टोल नाका दरम्यान सापळा रचण्यात आला, सापळा दरोडा टाकण्याच्या दिनांक 05/09/2026 रोजी पहाटे 05.00 ते 07.00 वाजेच्या दरम्यान सपोनि.लक्ष्मण उंबरे साहेब, ग्रेड पोउपनि इनामदार साहेब केज पोलीस ठाणे हद्दीमध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र 548 डी वर मौजे कोरेगाव फाटा येथे पारधी वस्ती जवळ भोईटे वस्तीकडे जाणाऱ्या रोडवर काही इमस दरोडा टाकण्याच्या तयारीत कपडयाने चेहरा झाकलेल्या अवस्थेमध्ये दिसले. सदर इसम पोलीस वाहन पाहुन पळु लागल्याने पोलीस अधीकारी व अमंलदार, होमगार्ड यांनी त्यांचा पाठलाग करुन त्यातील चार दरोडेखोरांना पकडले.

त्यांची विचारपूस केली असता त्यांनी त्यांची नावे महादेव कल्याण पवार (रा. कोरेगांव पारधीवस्ती, ता. केज, जि.बीड) अशोक मच्छिद्र पवार (रा. कोरेगांव पारधीवस्ती, ता. केज, जि.बीड), गणेश कल्याण पवार (रा. कोरेगांव पारधीवस्ती, ता. केज, जि.बीड), लहु मोतीराम पवार (रा. कोरेगांव पारधीवस्ती, ता. केज, जि. बीड) असे सांगीतले. महादेव कल्याण पवार यास पळून गेलेल्या इसमांचे नांव गांव विचारले असता त्याने पळुन गेलेल्या इसमांची नावे बबन उर्फ बबलु कल्याण पवार, अजय उर्फ दादा भागवत पवार, अनिल भागवत पवार, सुरेश उर्फ बप्या नवनाथ शिंदे, राम उर्फ नाक्या बाळु पवार (सर्व रा. कोरेगांव, पारधीवस्ती, ता. केज, जि. बीड), सुरज हरीदास काळे (रा. खडीक्रेशर जवळ टाकळी शिवार) आणि विलास उर्फ पकल्या सुरेश उर्फ तायडया शिंदे (रा. सांगवी शिवार) असे सांगीतले.

त्यांच्या अंगझडतीत धारदार हत्यार, लोखंडी टांबी, कोयते, लोखंडी सत्तुर, लोखंडी तलवार, पिवळ्या रंगाची रस्सी, लोखंडी विळा, मिर्ची पावड, चेहरा झाकण्याचा लाल कपडा व 08 मोटार सायकल असा एकुण 4,62,250/- रुपयांचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर आरोपीतांविरुध्द पोलीस ठाणे केज गुरनं. 568 / 2026 कलम 310 (4), (5) बीएनएस सह कलम 4 / 25 भारतीय हत्यार कायदा गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीबाबत पोलीस स्टेशन केज येथील अभिलेख तपासला असता त्यांच्या विरोधात पोलीस स्टेशन केज येथे धावत्या ट्रकवर चढुन ट्रक मधील साहित्य काढण्याचे, विविध स्वरुपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. क्षीरसागर हे करीत आहेत. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, सहायक पोलीस अधिक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. राहुल सुर्यतळ, सपोनि. लक्ष्मण उंबरे, सपोनि. क्षीरसागर, ग्रेड पोउपनि. इनामदार, सफौ. 1006 चव्हाण, सफौ. 39 बांगर, पोह. 1673 अहंकारे, पोअं. 1867 नितीन वारे, पोअं. 436 राहुल तरकसे, पोअं. 2192 दादाराव देवगुडे, पोअं. 471 गिते, पोअं. 74 कागदे, होमगार्ड 1884 अनिल वैरागे, 623 सुनिल ठोंबरे, 1885 पोपट वैरागी, 617 अकाश गालफाडे, 1890 सचिन जाधव, 1571 शिवानंद खरबड, 760 बिभीषण राख, 1839 मनोज गायकवाड, 1831 सुभाष कदम, 1822 दत्ता माने, 1797 सुरज भैरट यांनी केलेली आहे.



# माळकिनी येथे सव्वा लाख शिवलिंग निर्मिती व रुद्राभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

**महागाव | प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील दत्त मंदिर, माळकिनी येथे सद्गुरु शिवलिंग व्यंकट स्वामी महाराज यांच्या दिनांक 06/09/2026 रोज रविवारला संकल्पनेतून सव्वा लाख शिवलिंग निर्मिती, रुद्राभिषेक व विधिवत पूजाअर्चना तसेच महाप्रसादाचा भव्य धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

या धार्मिक सोहळ्यात शिवलिंग निर्मितीसाठी असंख्य महिला भाविक भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महिलांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

महागाव येथील महिला भाविक भक्तांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होता यावे यासाठी सौ. जयश्री संजय नरवाडे (नगरसेविका, न.प. महागाव तथा तालुकाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी, महागाव) यांचेकडून माळकिनी येथे जाण्या-येण्यासाठी पाच मोफत ट्रॅव्हल्सची व्यवस्था करण्यात आली होती

. या माध्यमातून महागाव परिसरातील अनेक महिला भाविकांना सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. सद्गुरु शिवलिंग व्यंकट स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, उपस्थित भाविकांनी या अविस्मरणीय सोहळ्याचा मनोभावे लाभ घेतला.

# मरळवाडीच्या ओमकेश आंधळे यांची MBBS साठी निवड

## भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले अभिनंदन



**परळी | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मौजे मरळवाडी येथील ओमकेश बालासाहेब आंधळे यांची MBBS अभ्यासक्रमासाठी अश्विनी मेडिकल कॉलेज, सोलापूर येथे निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल परळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी संपर्क कार्यालयात त्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातून वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल करणाऱ्या ओमकेश यांच्या यशाचे कौतुक करताना, त्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी आणि समाजसेवेची भावना जपत एक आदर्श डॉक्टर म्हणून नावलौकिक मिळवावा, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.


यावेळी मा.पं.स. सदस्य मारोतराव फड, नंदनजचे मा.सरपंच अनिल गुट्टे, माऊली आंधळे, विष्णुपंत मुंडे, दौलतराव फड, बालासाहेब आंधळे आदी उपस्थित होते.

ओमकेश आंधळे यांच्या यशामुळे मरळवाडी परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन त्र्यंबकेश्वर जि.नाशिक

## कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी प्रा.वा. ना.आंधळे

मुक्ताईनगर : एरंडोल जि.जळगाव येथील सुप्रसिद्ध कवी तथा समीक्षक प्रा.वा. ना.आंधळे यांची,दि.३ व ४ ऑक्टोबर२०२६ रोजी त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे संपन्न होणाऱ्या दोन दिवसीय चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनाच्या कवी संमेलनाचे अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन केंद्रीय कार्यकारिणीने त्यासंदर्भातील निमंत्रण पत्र त्यांना नुकतेच सुपूर्त केले आहे.



गेल्या चार दशकांपासून अव्याहत काव्यलेखन करणाऱ्या प्रा.आंधळे यांनी पाच वेळा राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या कविसमेलनांचे अध्यक्षपद भूषविले आहे. वृत्तपत्रांपासून निखळ वाङ्मयीन नियतकालिके व दिवाळी अंकांपर्यंत काव्यलेखन करणाऱ्या प्रा.आंधळे यांच्या सृजनाचा यथोचित सन्मान शालेय अभ्यासक्रमांच्या पाठयपुस्तकंपासून तर पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत महाराष्ट्रासह कर्नाटक व गुजरात राज्यातील विद्यापीठांनी व शालेय अभ्यास मंडळांनी केलाय.त्यांची `आई!मला जन्म घेऊ दे` ही कविता माईल स्टोन झाली असून या कवितेचे इंग्रजीसह तब्बल पंचेचाळीस भारतीय भाषेत उत्स्फूर्त अनुवाद झाले आहेत.सातासमुद्रापार जाणाऱ्या या कवितेला मिळालेला जनाधार पाहता आकाशवाणी, दूरदर्शन,यू ट्यूब चॅनल,वृत्तपत्र या प्रसार माध्यमांनी कवितेची व कवीची घेतलेली दखल प्रा.आंधळे यांच्या लेखन फलश्रुतीची नोंद करणारी आहे. डॉ.म.सु. पगारे लिखित `बा, तथागता!`या अडीचशे पानी मराठी विशाल कवितेचे अहिराणी बोलीत केलेले भाषांतर भाषा अभ्यासक व समीक्षक यांनी यथोचित गौरविले असून बुद्ध तत्वज्ञानावर आधारित अहिराणी बोलीतील पहिला अनुवादित काव्यग्रंथ म्हणून खान्देशाच्या नकाशात सन्मानाने नोंदवला गेला. प्रा.आंधळे यांच्या सृजन वाटचालीला मिळणाऱ्या चौफेर यशामुळेच त्यांच्या कवितांवर नुकतीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून दोन संशोधक प्राध्यापकांनीं पीएच.डी संपादन केलीय. सामाजिक बांधीलकीचा वसा जपणाऱ्या प्रा. आंधळे यांच्या लेखणीने दूरदर्शन मुंबई व दूरदर्शन दिल्ली येथून प्रसारित झालेल्या मराठी व हिंदी समाजहितैषी मालिकांसाठीही शीर्षक गीत लेखन करून जन मनापर्यंत आपले सृजन यथोचित पोहचवलेय.

अखिल भारतीय स्तरावर संपन्न होणाऱ्या सदर संमेलनाच्या कवी संमेलन अध्यक्षपदी त्यांची झालेली ही निवड त्यांच्या आजवरच्या लेखन साधनेची फलश्रुती असून त्यांच्या या निवडीचे साहित्यिक,सामाजिक,शैक्षणिक स्तरातून अभिनंदन होत आहे.

# इशान किशनचे नाबाद शतक; पूर्व क्षेत्राची दणकेबाज सुरुवात



**बेंगळुरू:** ड्युलेप ट्रॉफीच्या अंतिम सामन्याच्या पहिल्या दिवशी पूर्व क्षेत्राच्या (East Zone) फलंदाजांनी वर्चस्व गाजवत पश्चिम क्षेत्राविरुद्ध (West Zone) मजबूत स्थिती निर्माण केली आहे. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा पूर्व क्षेत्राने पहिल्या डावात ३ गडी गमावून ३०० धावांचा टप्पा ओलांडला होता. या सामन्याचे मुख्य आकर्षण ठरला तो स्टार यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन. त्याने नाजूक वेळी मैदानात उतरून एक शानदार आणि जबाबदार नाबाद शतक झळकावले. दुसऱ्या टोकाकडून कुमार कुशाग्रने दिलेल्या मोलाच्या साथीमुळे पूर्व क्षेत्राने पहिल्या दिवशी पूर्णपणे वर्चस्व राखले.

सामन्याच्या सुरुवातीला पश्चिम क्षेत्राने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या सत्रात पश्चिम क्षेत्राच्या वेगवान गोलंदाजांनी काहीसे शिस्तबद्ध मारा करत पूर्व क्षेत्राच्या आघाडीच्या फलंदाजांना अडचणीत आणले. १०० धावांच्या आतच पूर्व क्षेत्राचे तीन महत्त्वाचे फलंदाज बाद झाले होते. कर्णधार अभिमन्यू ईश्वरन आणि अनुभवी फलंदाज स्वस्तात बाद झाल्यामुळे पूर्व क्षेत्राचा संघ काहीसा दडपणाखाली आला होता. पश्चिम क्षेत्राच्या गोलंदाजांनी सामन्यावर पकड घट्ट करण्यास सुरुवात केली होती, परंतु त्यानंतर मैदानात आलेल्या इशान किशनने सामन्याचे चित्रच बदलून टाकले.

इशानने सुरुवातीला सावध पवित्रा घेत खेळपट्टीचा अंदाज घेतला आणि पश्चिम क्षेत्राच्या आक्रमक गोलंदाजीचा शांतपणे सामना केला. एकदा का खेळपट्टीवर डोळा बसल्यावर त्याने आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत चौफेर फटकेबाजी करण्यास सुरुवात केली. इशानने पश्चिम क्षेत्राच्या फिरकी आणि वेगवान अशा दोन्ही गोलंदाजीच्या आक्रमणाचा सहज सामना केला. विशेषतः फिरकीपटूंविरुद्ध त्याने मारलेले उत्तुंग षटकार आणि नयनरम्य चौकार प्रेक्षणीय होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)